वन्दे मातरम्

# म० गांधी व हिंदुस्थान-सरकार

यांजमधील

## समग्र पत्रें

( मूळ इंग्रजी )

अनुवादक

गणेश गंगाधर जांभेकर

( संपादक, 'लोकशिक्षण' )



" माझा पुष्कळसा काळ तुरुंगांत गेला आहे. मी सातआठ वेळां, कदाचित् दहा वेळां, तुरुंगांत गेलों आहे. बहुधा आणखी बरींच वर्षं मी तुरुंगांत काढीन, आणि कदाचित् तुरुंगांतच मरून जाईन."

—म० गांधी

१९४३

किंमत ४ आणे

प्रकाशक : र. ग. जोशी
'सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला'
१२, टिळक रस्ता, पुणें २

प्रथमावृत्ति : एप्रिल १९४३

मुद्रक : स. रा. सरदेसाई, बी.ए., एल्एल्.बी.
'समर्थ भारत' छापखाना
४१ बुधवार पेठ, पुणें २

# म० गांधी व हिंदुस्थान-सरकार
## यांजमधील
# समग्र पत्रव्यवहार

१४ ऑगस्ट, १९४२

प्रिय लॉर्ड लिन्‌लिथ्‌गौ,

सांप्रतची घोर आपत्ति उतावळेपणानें ओढवून घेण्यांत हिंदुस्थान-सरकारानें मोठी चूक केली. ह्या पदक्षेपाचें समर्थन करणारा सरकारी ठराव विपर्यस्त व भ्रमोत्पादक विधानांनीं भरलेला आहे. आपल्या हिंदी 'सहकाऱ्यां'ची आपणांस संमति मिळाली आहे ह्याला कांहीं महत्त्व असेल तर तें इतकेंच कीं, हिंदुस्थानांत अशा प्रकारची सेवाचाकरी करणारे लोक आपणांस सदैव मिळूं शकतात. ही सहकारिता म्हणजे 'येथून पाय काढा' म्हणून केलेल्या मागणीचें तें आणखी एक समर्थनच होय, मग जनता व पक्ष कांहींहि म्हणोत.

मी निदान सामुदायिक चळवळीस प्रारंभ करीपर्यंत तरी हिंदुस्थान-सरकारानें वाट पाहावयास हवी होती. चळवळ प्रत्यक्ष चालू करण्यापूर्वी मीं आपल्याला एक पत्र पाठविण्याचें पक्कें योजिलें आहे, असें सार्वजनिकरीत्या सांगितलें होतें. आपण राष्ट्रसभेची कैफियत निःपक्षपातानें पारखून पाहावी, अशी तद्द्वारा आपणांस विनंती करावयाची होती. आपणांस विदितच आहे कीं, राष्ट्रसभेनें स्वतःच्या संकल्पित मागणींत

आढळून आलेली प्रत्येक उणीव तत्परतेनें दूर केली आहे. अर्थात् आपण संधि दिली असती तर प्रत्येक अडचणीचा मला परिहार करतां आला असता. सरकाराच्या उतावळ्या वर्तनावरून एखाद्याला असें वाटेल कीं, राष्ट्रसभा प्रत्यक्ष प्रतिकाराच्या मार्गावर अत्यंत दक्षतेनें व क्रमाक्रमानें पाऊल टाकीत असल्यामुळें सर्व जगाचें मत तिजकडे वळेल–तसें तें वळूं लागलेंच होतें–आणि राष्ट्रसभेची मागणी फेटाळून देण्या-संबंधींच्या कारणांचा पोकळपणा उघडकीस येईल, अशी त्यांना भीति वाटत असावी. अखिल-भारतीय राष्ट्रसभा-समितीनें ठराव मान्य केल्यानंतर शुक्रवारीं व शनिवारीं मीं जीं भाषणें केलीं त्यांचा विश्वसनीय वृत्तान्त मिळेपर्यंत तरी सरकारानें खचित वाट पाहावयास हवी होती. त्यांमध्यें आपल्याला असें स्पष्ट दिसलें असतें कीं, मी उतावळीनें चळवळीस आरंभ करूं इच्छीत नव्हतों. त्यांत ध्वनित केलेल्या कालावधीचा सदुपयोग करून घेऊन राष्ट्रसभेची मागणी पूर्ण करण्याचा प्रत्येक संभवनीय मार्ग आपण चोखाळून पाहावयास हवा होता.

ह्या ठरावांत म्हटलें आहे :— " अधिक शहाणपणाचा विचार सुचेल ह्या आशेनें हिंदुस्थान-सरकारानें संयमपूर्ण वाट पाहिली. परंतु ही त्यांची आशा व्यर्थ ठरली आहे." मला वाटतें कीं, "अधिक शहाणपणाचा विचार" ह्याचा अर्थ राष्ट्र-सभेकडून आपल्या मागणीचा परित्याग, असा येथें अभिप्रेत आहे. हिंदुस्थानाला स्वातंत्र्य देण्यास वचनबद्ध झालेल्या

सरकारानें सदैव न्याय्य अशा ह्या मागणीच्या परित्यागाची आशा कां बरें करावी? ही मागणी करणाऱ्या पक्षाशीं संथपणें सारासारविचार करण्याऐवजीं तात्कालिक दडपशाहीनेंच त्याचा समाचार घ्यावयास हवा होता, अशा प्रकारचें आह्वान का हें आहे? ही मागणी मान्य केल्यानें "हिंदुस्थानावर अनवस्था-प्रसंग कोसळेल," असें म्हणणें म्हणजे मानवजातीच्या भोळसर-पणावर दीर्घकाल विसंबून राहणें होय, असें सूचित करण्याचें मीं धाष्टर्य करितों. तें कसेंहि असो, ही मागणी तात्काळ धुडकावून दिल्यामुळें मात्र राष्ट्र व सरकार यांजवर अनवस्था-प्रसंग कोसळला आहे खास. मित्रराष्ट्रांच्या उद्दिष्टाशीं हिंदुस्थानाला एकरूप करण्याचा हरएक प्रयत्न राष्ट्रसभा करीत होती.

सरकारी ठरावांत म्हटलें आहे :—"गव्हर्नर-जनरल-इन्-काउन्सिल यांस गेले कांहीं दिवस हेंहि विदित आहे कीं, राष्ट्रसभा-पक्षानें इतर गोष्टींबरोबर दळणवळणाच्या मार्गांत व लोकोपयोगी व्यवहार-साधनांत व्यत्यय आणणें, संपांची संघटना करणें, सरकारी नोकरांच्या राजनिष्ठेंत बिघाड करणें, आणि सैन्यभरतीसुद्धां संरक्षणविषयक उपायांस प्रतिबंध करणें इत्यादि बेकायदेशीर व कांहीं बाबतींत हिंसात्मक हालचाली करण्याच्या हेतूनें भयंकर तयारी चालविलेली आहे." हा वस्तुस्थितीचा धडधडीत विपर्यास होय. कोणत्याहि अवस्थेंत हिंसा स्वप्नींहि आणिलेली नव्हती. अहिंसात्मक चळवळींत कोणकोणत्या गोष्टींचा अंतर्भाव करणें शक्य आहे हें सांगणाऱ्या

एका व्याख्येचा अर्थ अशा दुष्ट व धूर्त रीतीनें करण्यांत आला आहे कीं, राष्ट्रसभा जणूं काय हिंसात्मक चळवळीचीच तयारी करीत होती. राष्ट्रसभेच्या मंडळ्यांतून प्रत्येक गोष्टीची उघडपणें चर्चा केली जात होती; कारण, गुप्त रीतीनें कांहींच करावयाचें नव्हतें. आणि ब्रिटिश लोकांनाच घातक होणारी नोकरी सोडून द्या असें जर मीं आपणांस सांगितलें, तर त्यामुळें आपल्या राजनिष्ठेंत मीं बिघाड केला असें कसें होतें? प्रमुख राष्ट्रसभानुयायांच्या परोक्ष हे भ्रमोत्पादक परिच्छेद प्रसिद्ध करण्याऐवजीं सरकारास ह्या "तयारी"चा सुगावा लागतांक्षणींच तयारी करण्यांत गुंतलेल्या मंडळीस त्यांनीं जाब विचारावयास हवा होता. तो मार्ग यथायोग्य झाला असता. आपल्या ठरावांतील निराधार विधानांनीं त्यांनीं स्वतःला अन्याय्य वर्तनाच्या आरोपास पात्र करून घेतलें आहे.

स्वतःकडे लक्ष देण्यास भाग पाडण्याइतकी त्यागबुद्धि लोकांमध्यें निर्माण करावी, हा राष्ट्रसभेच्या चळवळीचा उद्देश होता. आपल्याला लोकांचें पाठबळ किती आहे तें सिद्ध करावें असा तिचा उद्देश होता. बुध्द्या अहिंसात्मक अशी ही लोकांची चळवळ दडपून टाकण्याचा प्रयत्न करणें शाहाणपणाचें होतें काय?

सरकारी ठरावांत पुढें म्हटलें आहे:—"राष्ट्रसभा हें कांहीं हिंदुस्थानाचें मुख नव्हे. तरीसुद्धां स्वतःला वर्चस्व मिळविण्यासाठीं व आपलें सर्वाधिकारी ( totalitarian ) धोरण पुढें चालविण्यासाठीं तिच्या पुढाऱ्यांनीं हिंदुस्थानाला संपूर्ण राष्ट्रीयत्व

प्राप्त करून देण्याच्या प्रयत्नांत सतत व्यत्यय आणिलेला आहे." येणेंप्रमाणें हिंदुस्थानाच्या सर्वांत जुन्या राष्ट्रिय संघटनेवर आरोप करणें म्हणजे तिची भयंकर बेअब्रू करणें होय. ज्या सरकारानें स्वातंत्र्यसंपादनाचा प्रत्येक राष्ट्रिय प्रयत्न हाणून पाडून राष्ट्र-सभेला रसातळास नेण्याचा 'येन केन प्रकारेण' सतत उद्योग केला आहे असें प्रसिद्ध झालेल्या कागदपत्रावरून सिद्ध करतां येईल, त्या सरकाराच्या तोंडीं ही भाषा मुळींच शोभत नाहीं.

भारतीय स्वातंत्र्याच्या घोषणेबरोबरच राष्ट्रसभेला सुस्थिर असें तात्पुरतें सरकार स्थापितां येईल, अशा सरकारास जर भरंवसा वाटत नसेल तर त्यांनीं मुस्लिम लीगला तसें करण्यास सांगावें, आणि लीगनें बनविलेलें कोणतेंहि राष्ट्रिय सरकार राष्ट्रसभा निष्ठापूर्वक मान्य करील, ही राष्ट्रसभेनें पुढें केलेली योजना हिंदुस्थान-सरकारानें विचारांतसुद्धां घेण्याची कृपा केलेली नाहीं. राष्ट्रसभेवरील सर्वाधिकारलालसेच्या आरोपाशीं अशा प्रकारची योजना क्वचितच सुसंगत होय.

सरकारानें पुढें केलेल्या योजनेची मला परीक्षा करूं द्या. ती योजना अशी आहे:—" वैर थांबल्याबरोबर, हिंदुस्थान आपलें निर्णय-स्वातंत्र्य पूर्ण राखून कोणत्या तरी एकाच नव्हे तर सर्व पक्षांचा पाठिंबा असलेली, आणि स्वकीय परिस्थितीस अत्यंत जुळती अशी आपणास वाटणारी राज्यपद्धति स्वतःकरितां योजील." ह्या योजनेंत कांहीं तथ्यांश आहे काय ? सांप्रत-सुद्धां सर्व पक्षांत मतैक्य झालेलें नाहीं. आणि स्वातंत्र्य हस्तगत

होण्यापूर्वी सर्व पक्षांनीं सहकार्य करणें जर अवश्य आहे, तर युद्ध संपल्यावर का हें मतैक्य याहून अधिक शक्य होणार आहे ? पक्ष हें छत्र्यांसारखे वाटेल तेव्हां उपटतात; कारण, त्यांचें प्रातिनिधिक स्वरूप लक्षांत न घेतांच सरकार पूर्वापर करीत आलें त्याप्रमाणें त्यांचें स्वागत करणार; आणि त्या पक्षांनीं स्वातंत्र्यास नांवाला मान्यता देऊन राष्ट्रसभेस व तिच्या चळवळीस जर का विरोध केला तर सरकारानें देऊं केलेली ही योजना हुकावयाची हें ठरलेलेंच. म्हणून तर " प्रथम पाय काढा ", ही तर्कशुद्ध घोषणा. ब्रिटिश सत्ता लयास जाऊन हिंदुस्थानाच्या राजकीय दर्जात जेव्हां मूलभूत स्थित्यंतर घडून येईल—जेव्हां त्याचें पारतंत्र्य संपून तें स्वतंत्र होईल—तेव्हांच कोठें तात्कालिक किंवा स्थायिक असें खरेंखुरें प्रातिनिधिक सरकार स्थापणें शक्य होईल. ह्या मागणीच्या प्रवर्तकास जिवंत समाधि देण्यानें पेंचप्रसंग सुटलेला नाहीं, तर तो अधिक बिकट झालेला आहे.

ह्यानंतर ठरावांत म्हटलें आहे:—" लक्षावधि हिंदी लोक स्वकीय भवितव्यतेविषयीं साशंक होऊन, शत्रूस बळी पडलेल्या कितीतरी देशांच्या दुःखद अनुभवांकडे दुर्लक्ष करूनसुद्धां परचक्राला आलिंगन देण्यास तयार आहेत, अशी राष्ट्रसभापक्षानें मांडलेली सूचना ह्या थोर देशांतील लोकांची खरी मनोभावना व्यक्त करीत आहे, ही गोष्ट हिंदुस्थान-सरकारास मान्य होणें शक्य नाहीं." लक्षावधि लोकांची मला माहिती नाहीं; परंतु राष्ट्रसभेच्या म्हणण्याला आधारभूत अशी मी

स्वतःची साक्ष देऊं शकतों; राष्ट्रसभेच्या पुराव्यावर विश्वास ठेवण्यास किंवा न ठेवण्यास सरकार मोकळें आहे.

कोणत्याहि साम्राज्यसत्तेला स्वतःला धोका आहे असें सांगितलेलें खपत नाहीं. इतर साम्राज्यसत्तांवर ओढवलेला अनर्थ ग्रेट ब्रिटननें टाळावा, अशी राष्ट्रसभेची मनीषा असल्यामुळेंच त्यानें स्वसंतोषानें हिंदी स्वातंत्र्याची घोषणा करून साम्राज्यवाद टाकून द्यावा, असें ती त्याला सांगत आहे. केवळ अत्यंत स्नेहशील हेतूंव्यतिरिक्त अन्य कोणत्याहि दृष्टीनें राष्ट्रसभेनें ही चळवळ हातीं घेतलेली नाहीं. जितका हिंदुस्थानाप्रीत्यर्थ तितकाच ब्रिटिश जनता व मानवजात यांच्याप्रीत्यर्थ, साम्राज्यवाद नष्ट करण्याचा राष्ट्रसभेचा प्रयत्न आहे. विरुद्ध बाजूनें कोणीं कांहीं म्हटलें तरी मी असें निक्षून सांगतों कीं, हिंदुस्थान व जग यांच्या हिताव्यतिरिक्त राष्ट्रसभेला स्वतंत्र असा दुसरा कोणताहि स्वार्थ नाहीं.

ठरावाच्या वक्तृत्वपूर्ण उपसंहारांतील पुढील वाक्य मौजेचें आहेः—"परंतु हिंदुस्थानाचें संरक्षण करण्याची, हिंदुस्थानाचें युद्धसामर्थ्य टिकवून धरण्याची, हिंदुस्थानाच्या हितसंबंधांस धक्का लागूं न देण्याची, भीडभाड न ठेवतां जनतेंतील वेगवेगळ्या वर्गांत समतोलपणा राखण्याची जबाबदारी केवळ त्यांच्यावर आहे." मला जें कांहीं म्हणावयाचें तें इतकेंच कीं, मलाया, सिंगापूर व ब्रह्मदेश येथील अनुभवानंतर सत्याचें हें केवळ विडंबन होय. वेगवेगळ्या पक्षांत "समतोलपणा" राखण्याचा हक्क हिंदुस्थान-

सरकारानें सांगावा हें पाहून तर खेदच होतो. कारण, त्यांना तें स्वतःच निःसंशय जबाबदार आहे.

आणखी एक गोष्ट. घोषित केलेलें उद्दिष्ट हिंदुस्थान-सरकाराला व आम्हांला सामायिक आहे. अत्यंत स्पष्ट शब्दांत सांगावयाचें म्हणजे, चीन व रशिया यांच्या स्वातंत्र्याचें संरक्षण हें तें होय. हें उद्दिष्ट सिद्धीस नेण्यासाठीं हिंदुस्थानाचें स्वातंत्र्य अवश्य नाहीं असें हिंदुस्थान-सरकाराला वाटतें, तर मला याच्या अगदीं उलट वाटतें. जवाहरलाल नेहरू यांस मीं माझा मानदंड बनविलें आहे. स्वतःचे वैयक्तिक संबंध आल्यामुळें त्यांस चीन व रशिया यांच्या अत्यंत निकट येऊन ठेपलेल्या नाशाचें दुःख माझ्यापेक्षां—किंबहुना आपल्यापेक्षांसुद्धां असें मी म्हणेन —पुष्कळच अधिक जाणवतें. त्या दुःखांत साम्राज्यसत्तेशीं असलेलें आपलें पुरातन वैरहि विसरण्याचा त्यांनीं प्रयत्न केला. फासीवाद ( Fascism ) व नात्सीवाद ( Nazism ) यांचा विजय मजपेक्षांहि त्यांस पुष्कळच अधिक भयावह वाटतो. मीं त्यांच्याशीं किती तरी दिवस वाद घातला आहे. मीं स्वीकारिलेल्या पक्षाविरुद्ध ते इतक्या निकरानें भांडले कीं, मला त्याचें शब्दांनीं वर्णन करतां येत नाहीं. परंतु वस्तु-स्थितीच्या अनिवार्यतेपुढें त्यांचा सर्व कोटिक्रम लंगडा पडला. हिंदुस्थानाच्या स्वातंत्र्यास मोठा धोका आहे असें स्पष्टपणें दिसून येतांच त्यांनीं माघार घेतली. अशा पराक्रमी मित्राला व सहकाऱ्याला तुरुंगांत टाकून आपण खरोखर चूक केली आहे.

सामायिक उद्दिष्ट एकच असतांनासुद्धां, लगोलग दडपशाही हेंच राष्ट्रसभेच्या मागणीला सरकारचें जर उत्तर असेल, तर ब्रिटिश सरकारानें मित्रराष्ट्रांचा खरा कैवार घेण्याच्या बुद्धीपेक्षां साम्राज्य-विषयक धोरणाचा एक अपरिहार्य भाग म्हणून हिंदुस्थानावरील स्वामित्वास चिकटून राहण्याचा आपला मनोगत निश्चयच अधिकांशानें दर्शविला, असें मी अनुमान केल्यास त्यांत त्यांना आश्चर्य वाटूं नये. ह्या निश्चयामुळेंच राष्ट्रसभेची मागणी धुडकाविली जाऊन दडपशाहीस तडकाफडकीं प्रारंभ झाला. इतिहासास अज्ञात अशा अपूर्व प्रमाणावर चालूं असलेला आजकालचा परस्पर संहार हा तर जीव गुदमरून टाकणारा आहेच; पण प्रस्तुत ठरावांत पुरेपूर भरलेल्या खोटेपणामुळें अमलांत येणाऱ्या निर्घृण हत्येबरोबर होत असलेला सत्याचा संहार राष्ट्रसभेच्या पक्षास बळकटी आणीत आहे.

हें लांबलचक पत्र आपणास पाठवावें लागत आहे म्हणून मला अत्यंत दुःख होतें. परंतु आपलें वर्तन मला कितीहि नापसंत असलें तरी आपणांस परिचित असलेला माझा स्नेह पूर्ववतच आहे. हिंदुस्थान-सरकारानें आपल्या एकंदर धोरणाचा फेरविचार करावा, अशी मी अद्यापि याचना करूं इच्छितों. ब्रिटिश लोकांचा विश्वासू मित्र म्हणविणाऱ्या जनाच्या ह्या याचनेकडे दुर्लक्ष करूं नका. ईश्वर आपणांस सन्मार्ग दाखवो !

आपला सदैव विश्वासू

**मो. क. गांधी**

---

# म०. गांधी यांस लॉर्ड लिन्लिथ्गो यांचें पत्र

२२ ऑगस्ट, १९४२

प्रिय मि. गांधी,

आपलें ता. १४ ऑगस्टचें पत्र एकदोन दिवसांपूर्वीच काय तें मला पोंचलें असून त्याविषयीं मी आपला फार आभारी आहें. आपण आपल्या पत्रांत भलेपणानें जें कांहीं लिहिलें आहे तें मीं अतिशय लक्षपूर्वक वाचलें आहे, हें सांगणें नलगे; आणि आपल्या मतांना मीं पूर्ण महत्त्व दिलें आहे. परंतु परिणामीं मात्र आपण गव्हर्नर-जनरल-इन्-काउन्सिल यांच्या ठरावावर केलेली टीका किंवा हिंदुस्थान-सरकाराच्या एकंदर धोरणाचा विचार करण्यासंबंधींची आपली विनंती मला मान्य करतां येईल असें वाटत नाहीं.

आपला विश्वासू

लिन्लिथ्गो

# हिंदुस्थान-सरकाराचे चिटणीस यांस म० गांधींचें पत्र

२१ सेप्टेंबर, १९४२

महाशय,

राष्ट्रसभा-व्यवहार-प्रकरणीं सांप्रत जें सरकारी धोरण चालू आहे त्याचें हिंदी काउन्सिलरांनीं व इतरांनीं एकमुखानें स्तुतिस्तोत्र गायिलें असलें तरी मी असें निश्चित म्हणण्याचें साहस करितों कीं, नामदार व्हाइसरॉय-साहेबांना लिहावयाच्या माझ्या संकल्पित पत्राची व तदनंतरच्या फलश्रुतीची सरकारानें जर केवळ वाट पाहिली असती तर देशावर कोणताहि अनर्थ ओढवला नसता. वर्तमानपत्रांतून वर्णिलेली शोचनीय हानि खात्रीनें टाळतां आली असती. ..... . . . .....

विरुद्ध बाजूनें जें जें म्हटलें गेलें आहे तें सर्व जमेस धरूनहि मी असें प्रतिपादितों कीं, राष्ट्रसभेचें धोरण अद्यापि निःसंदिग्धपणें अहिंसावादी आहे. राष्ट्रसभेच्या पुढाऱ्यांना एकजात पकडल्यामुळें लोक क्रोधानें वेडे होऊन त्यांचा आत्मसंयम सुटण्यापर्यंत मजल गेली असें दिसतें. माझी अशी भावना आहे कीं, झालेल्या हानीविषयीं राष्ट्रसभा नव्हे, तर सरकारच जबाबदार आहे. सरकारापुढें योग्य असा एकच मार्ग आहे असें मला वाटतें, आणि तो म्हणजे राष्ट्रसभेच्या नेत्यांना मुक्त करणें, दडपशाहीचे सर्व निर्बंध मागें घेणें,

आणि तडजोडीचे मार्ग व उपाय शोधून काढणें हा होय. कोणत्याहि राजरोस अत्याचाराचा बंदोबस्त करण्यास सरकारापाशीं भरपूर साधनसंपत्ति खात्रीनें आहे.

मला वर्तमानपत्रें घेण्याची ज्याअर्थी परवानगी आहे त्याअर्थी देशांत घडून येणाऱ्या शोचनीय प्रकारांसंबंधींची माझ्या मनांतील प्रतिक्रिया सरकारास कळविणें आपलें कर्तव्य होय, अशी माझी भावना आहे. कैदी ह्या नात्यानें अशा प्रकारचा पत्रव्यवहार करण्याचा मला हक्क पोंचत नाहीं, असें जर सरकारास वाटत असेल तर त्यांनीं तसें म्हणण्याचाच अवकाश, कीं अशी चूक मीं पुनः होऊं देणार नाहीं.

मो. क. गांधी

टीप : ह्या पत्राची रीतसर पोंच धाडली गेली.

# म० गांधी व लॉर्ड लिन्‌लिथ्‌गौ यांच्यामधील वैयक्तिक पत्रव्यवहार

(वैयक्तिक)

न्यू इयर्स ईव्ह [३१ डिसेंबर], १९४२

प्रिय लॉर्ड लिन्‌लिथ्‌गौ,

हें पत्र अतिशय वैयक्तिक आहे. बायबलमधील आज्ञेच्या विरुद्ध जाऊन, अनेक सूर्यास्त लोटले तरी मीं आपल्याविषयीं बाळगिलेलें वैर अद्यापि मिटविलेलें नाहीं; पण आपल्या-संबंधींची माझ्या अन्तःकरणांतील जळजळ काढून टाकल्या-विना हें जुनें वर्ष मीं उलटूं देतां कामा नये. आपण स्नेही आहों अशी माझी समजूत होती, आणि तो स्नेह अद्यापि तसाच टिकून असल्यास मला आनंद होईल. तथापि गेल्या ९ ऑगस्टपासून जें कांहीं घडलें त्यानंतर आपण मला अद्यापि स्नेही मानतां कीं नाहीं याचा मला वानवा आहे. आपल्या 'गादी'वरील दुसऱ्या कोणत्याहि व्यक्तींशीं माझा आपल्या-इतका निकट संबंध प्रायः आला नसावा.

आपण केलेली माझी धरपकड, त्यानंतर आपण काढलेलें पत्रक, राजाजींस आपलें उत्तर व त्याच्या समर्थनार्थ दिलेलीं कारणें, मि. ॲमरि यांचा मजवरील हल्ला, आणि मला एक यादीच देतां येईल अशा पुष्कळशा दुसऱ्या गोष्टी यांज-वरून असें दिसतें कीं, केव्हांना केव्हां तरी आपल्याला

माझ्या प्रामाणिकपणाविषयीं खास शंका आलेली असली पाहिजे. ह्याच संबंधांत इतर राष्ट्रसभानुयायांचा निर्देश हा केवळ जातां जातां केलेला होय. राष्ट्रसभेवर आरोपिलेल्या सर्व पापाचें मूळ व उगमस्थान (*fons et origo*) काय तो मीच असल्याचें दिसतें. मीं जर आपल्या स्नेहास पारखा झालेला नसेन, तर तडकाफडकीं कडक उपाय योजण्यापूर्वी आपण मला बोलावून घेऊन आपल्या मनांतील शंकाकुशंका कां कळविल्या नाहींत, आणि वस्तुस्थितीचा पडताळा कां घेतला नाहीं? इतर लोक मजकडे ज्या दृष्टीनें पाहतात त्या दृष्टीनें मी स्वतःकडे खास पाहूं शकतों. पण ह्या प्रकरणीं मी सर्वस्वीं फसलों आहें. ह्या संबंधांत सरकारी गोटांतून मजविषयीं निघालेल्या सर्व पत्रकांतून धडधडीत सत्यापलाप केलेले मला आढळतात. मी इतका कांहीं पतित झालों आहें कीं, चिमूर-प्रकरणीं उपोषण करीत असलेल्या आपल्या मरणोन्मुख स्नेह्याशीं —प्रो. भन्साळी यांच्याशीं—मला संबंधहि जोडतां आला नाहीं; आणि इकडे कडक सरकारी नियंत्रणांतून प्रसिद्ध झालेल्या वृत्तपत्रीय हकीकतींव्यतिरिक्त अन्य आधार मजपाशीं नसतांना-सुद्धां, राष्ट्रसभावादी म्हणून प्रसिद्ध असलेल्या कांहीं लोकांनीं केलेल्या मानीव अत्याचारांचा मीं निषेध करावा, अशी अपेक्षा करण्यांत येत आहे. ह्या हकीकतींवर माझा मुळींच विश्वास बसत नाहीं हें मला मान्य केलें पाहिजे. मला आणखी पुष्कळ लिहितां येईल; पण आपली ही करुण कहाणी मीं लांबवितां

कामा नये. माझी खात्री आहे कीं, मीं जें कांहीं म्हटलें आहे तें आपल्याला त्यांतील तपशील भरतां येण्यास पुरेसें आहे.

आपणांस विदितच आहे कीं, १९१४ च्या शेवटीं मी दक्षिण आफ्रिकेंतून हिंदुस्थानास जो परत आलों तो १९०६ मध्यें मला मिळालेला जीवनादेश घेऊन आलों. तो म्हणजे, मानवजातींत जीवनाच्या एकूणएक व्यवहारांमध्यें असत्य व हिंसा यांच्या जागीं सत्य व अहिंसा यांचा प्रसार करणें हा होय. सत्याग्रह-धर्माला पराभव माहीत नाहीं. हा संदेश प्रसृत करण्याच्या अनेक मार्गांपैकीं कारागृहवास एक आहे; परंतु त्याला मर्यादा आहेत. आपण मला अशा राजवाड्यांत ठेविलें आहे कीं, तेथें योग्य अशी प्रत्येक शारीरिक सुखसोय निश्चित पुरविली जाते. केवळ कर्तव्य म्हणून मीं तिचा मोकळेपणानें उपयोग करून घेतलेला आहे, ऐषआराम म्हणून कधींच नव्हे. आशा ही कीं, ज्यांच्या हातीं सत्ता आहे त्यांना आपण निरपराधी लोकांवर अन्याय केला आहे हें कधीं तरी उमजून येईल. मीं सहा महिन्यांचा संकल्प सोडला असून हा अवधि संपत आला तसा माझा धीरहि सुटत चालला आहे. मला स्वतःला जो सत्याग्रहधर्म अवगत आहे तदनुसार अशा आपत्प्रसंगीं एक उपाय विहित आहे. एका वाक्यांत सांगायाचें तर, "उपोषण करून देहदंड सोस", हा तो होय. त्याच धर्मानुसार केवळ निर्वाणीच्या प्रसंगाव्यतिरिक्त त्याचा अवलंब करणें निषिद्ध मानिलें आहे. तो टाळणें शक्य असेल

तर मला त्याचा अवलंब करण्याची इच्छा नाहीं. तो टाळ-ण्याचा मार्ग हा आहे : माझी चूक किंवा चुका मला पटवून द्या, म्हणजे मी पूर्ण भरपाई करीन. वाटल्यास आपण मला बोलावून घ्या, किंवा आपलें मनोगत ज्याला अवगत आहे आणि जो माझी खात्री पटवूं शकेल अशा कोणाला तरी पाठवून द्या. आपली इच्छाच असेल तर इतरहि पुष्कळ मार्ग आहेत. उत्तर लवकरच येईल अशी आशा मीं बाळगावी काय?

नूतन वर्ष आपणां सर्वांनाच शांतिप्रद होवो.

आपला विश्वासू स्नेही
मो. क. गांधी

---

# म० गांधी यांस लॉर्ड लिन्‌लिथ्‌गो यांचें पत्र

(वैयक्तिक)

१३ जानेवारी, १९४३

प्रिय मि. गांधी,

आपलें ३१ डिसेंबर १९४२चें वैयक्तिक पत्र नुकतेंच पावलें आणि त्याविषयीं मी आपला आभारी आहें. त्याचें वैयक्तिक स्वरूप मला पूर्णपणें मान्य असून त्यांतील प्रांजलपणाचें मी स्वागत करितों. आणि आपल्या मनीषेप्रमाणें माझें उत्तरहि आपल्या पत्राइतकेंच प्रांजलपणाचें व सर्वस्वीं वैयक्तिक राहील.

२. आपलें पत्र आल्यानें मला संतोष झाला. कारण, आपल्या पूर्व ऋणानुबंधानुसार मोकळेपणानें सांगावयाचें म्हणजे, अलीकडे कित्येक महिने मी अत्यंत खट्टू झालों आहे : प्रथमतः ऑगस्टमध्यें राष्ट्रसभेनें जें धोरण स्वीकारिलें त्यामुळें; आणि दुसरी गोष्ट म्हणजे, त्या धोरणामुळें सर्व देशभर हिंसा व अत्याचार घडून आले—आणि हें असें घडणार हें स्पष्टच होतें (परचक्रापासून हिंदुस्थानास निर्माण होणाऱ्या धोक्यां-संबंधीं मी कांहींच म्हणत नाहीं)—तरी आपल्याकडून किंवा कार्यकारी समितीकडून एका शब्दानेंहि त्या हिंसेचा व अत्या-चारांचा निषेध केला गेला नाहीं त्यामुळें. आपण प्रथम पुण्यास गेला तेव्हां आपल्याला वृत्तपत्रें मिळत नव्हतीं हें मला माहीत होतें, आणि त्यामुळें आपण मुग्ध होतां हें मीं मान्य केलें. पण आपल्याला व कार्यकारी समितीला इष्ट

वाटतील ती वृत्तपत्रें मिळण्याची जेव्हां व्यवस्था करण्यांत आली तेव्हां मला असा भरंवसा वाटत होता कीं, त्या वृत्तपत्रांतून चालू घडामोडींचे जे तपशील येत त्यांमुळें आम्हां सर्वांइतकाच आपल्यालाहि धक्का बसून दुःख झालें असेल, आणि त्यांसंबंधींचा स्वकीय निषेध निःसंदिग्धपणें सर्वत्र कळेसा व्यक्त करण्याची आपणांस उत्कंठा लागेल. परंतु तसें घडलें नाहीं. आणि विशेषतः खून करणें, पोलिस अधिकाऱ्यांना जिवंत जाळणें, आगगाड्या उडवून देणें, मालमत्तेचा विध्वंस करणें, तरुण विद्यार्थ्यांची दिशाभूल करणें इत्यादि प्रकारें हिंदुस्थानाच्या नांवाला व राष्ट्रसभा-पक्षाला जो इतका काळिमा लागला आहे त्याचा विचार मनांत येऊन तर मी खरोखरच निराश झालों आहे. माझ्या शब्दावर आपला विश्वास असूं द्या कीं, आपण ज्या वृत्तपत्रीय हकीकतींचा निर्देश करतां त्यांना चांगला आधार आहे—तो नसताच तर मला बरें वाटलें असतें; कारण, ही कहाणी मोठी वाईट आहे. राष्ट्रसभेची चळवळ, तो पक्ष, व त्याचा पुढाकार पतकरणारे अनुयायी यांजवरील आपला थोर अधिकार व वजन मला चांगलें माहीत आहे; आणि पुनः अतिशय प्रांजलपणें बोलावयाचें म्हणजे, आपल्यावर ही मोठी जबाबदारी नसती तर बरें झालें असतें असें मला वाटतें. (आणि दुःखाची गोष्ट म्हणजे, आरंभींची जबाबदारी पुढाऱ्यांवर असली तरी कायदेभंग करणारे म्हणून किंवा त्याचे बळी म्हणून घडून येणारे परिणाम इतरांना भोगावे लागतात.)

३. परंतु जें कांहीं घडलें आहे त्या दृष्टीनें आपण आपलें पाऊल मार्गे घेऊन गेल्या उन्हाळ्यांतील धोरणाशीं असलेला आपला संबंध तोडूं इच्छितां, असा आपलें पत्र वाचून मी जो अर्थ करीत आहें तो जर बरोबर असेल, तर आपण मला तसें कळविण्याचाच अवकाश कीं, ताबडतोब मी त्या गोष्टीचा पुढें विचार करीन. आणि आपला हेतु मला जर उमगलेला नसेल, तर कोणत्या बाबतींत तसें घडलें आहे तें अविलंबें कळविण्यास, आणि कोणती निश्चित सूचना आपण मला करूं इच्छितां तें सांगण्यास, आपण संकोच वाळगतां कामा नये. गेलीं बरींच वर्षे आपण मला पुरेसे ओळखीत असल्यामुळें आपल्याकडून येणारें पत्र मी नेहमींप्रमाणेंच अत्यंत लक्षपूर्वक वाचून पाहीन, त्याला अधिकांत अधिक महत्त्व देईन, आणि आपली भावना व हेतु समजून घेण्यासाठीं त्याचा अत्यंत काळजीपूर्वक आदर करीन याविषयीं आपण भरंवसा बाळगालच.

आपला विश्वासू
लिन्‌लिथ्‌गो

# लॉर्ड लिन्‌लिथ्‌गो यांस म० गांधींचें पत्र

( वैयक्तिक )

१९ जानेवारी, १९४३

प्रिय लॉर्ड लिन्‌लिथ्‌गो,

आपलें १३ तारखेचें कृपापत्र काल दुपारीं अडीच वाजतां मला मिळालें. आपल्याकडून कधींकाळीं समाचार ऐकण्याची आशा मीं बहुतेक सोडून दिली होती. माझ्या ह्या उतावळी-विषयीं कृपा करून क्षमा असावी.

आपण मला जातीबाहेर टाकलेलें नाहीं, हें आपल्या पत्रावरून दिसून आल्यामुळें मला आनंद होत आहे.

माझें ३१ डिसेंबरचें पत्र म्हणजे एकप्रकारें आपल्याविरुद्ध गुरगुर होती. ही आपली उलट गुरगुर आहे. त्याचा अर्थ हा कीं, माझी जी धरपकड करण्यांत आली ती आपल्याला निश्चित योग्य वाटत असून, आपल्या मतें ज्या कांहीं गोष्टी न करण्याची मीं चूक केली त्याविषयीं आपल्याला खेद होत आहे.

माझ्या पत्रावरून आपण करीत असलेलें अनुमान यथार्थ नाहीं, असें मला म्हणावेंसें वाटतें. आपण जो अन्वय लाविला आहे त्या दृष्टीनें माझें पत्र मी पुनः वाचून पाहिलें; पण आपण केलेला अर्थ मला त्यांत दिसला नाहीं. उपोषण करण्याची माझी इच्छा होती, आणि आपल्यामधील ह्या पत्रव्यवहारांतून कांहींच निष्पन्न होणार नसेल आणि देशभर धिंगाणा घालीत

असलेल्या सार्वत्रिक महागाईमुळें लक्षावधि जीवांच्या हाल-अपेष्टांबरोबर राष्ट्रांत चालू असलेले प्रकार केवळ अगतिकपणें पाहतच मला राहावें लागणार असेल, तर अद्यापि तें करावें अशीच माझी इच्छा आहे.

माझ्या पत्राचा आपण केलेला अर्थ मला मान्य नसल्यास मीं एखादी निश्चित सूचना करावी, अशी आपली इच्छा आहे. पण कार्यकारी समितीच्या सभासदांमध्यें आपण मला नेऊन सोडाल तरच हें करणें मला शक्य होईल.

माझी चूक किंवा त्याच्याहि पलीकडील कांहीं प्रकार घडला असेल—ह्याची आपल्याला खात्री वाटत आहे हें स्पष्ट आहे—तर तो मला पटवून देतां आल्यास माझ्या स्वतःच्या वर्तनापुरती तरी पूर्ण व उघड कबुली देऊन पुरेशी भरपाई करण्यासाठीं मला दुसऱ्या कोणाचाहि विचार घेणें नलगे. पण स्वतःकडून चूक झाली अशी माझी खात्री पटलेली नाहीं. २१ सेप्टेंबर १९४२ रोजीं हिंदुस्थान-सरकारच्या चिटणिसांना धाडलेलें माझें पत्र आपल्या अवलोकनांत आलें कीं नाहीं कोण जाणे. त्यांत व १४ ऑगस्टला आपणांस लिहिलेल्या माझ्या पत्रांत मीं जें कांहीं म्हटलें आहे त्याला मी धरून आहें.

गेल्या ९ ऑगस्टपासून घडलेल्या प्रकारांविषयीं मला अर्थात् हळहळ वाटते. पण त्यांसंबंधींचा सर्व दोष हिंदुस्थान-सरकारच्या पदरीं मीं बांधलेला नाहीं काय? शिवाय ज्या गोष्टींवर आपलें वजन किंवा नियंत्रण मला राखणें शक्य

नाहीं, आणि ज्यांच्यासंबंधीं केवळ एकांगी वृत्तान्त मला कळला आहे त्या गोष्टींवर कोणतेंहि मत व्यक्त करणें मला शक्य नव्हतें. आपल्या त्या त्या शाखांच्या मुख्याधिकाऱ्यांकडून स्वतःपुढें ठेवण्यांत येणाऱ्या वृत्तान्तांचा खरेपणा सकृद्दर्शनीं मान्य करणें आपणांस भागच आहे. पण मींहि तसें करावें अशी अपेक्षा आपण मजकडून करणार नाहीं. अशा प्रकारचे वृत्तान्त चुकीचे असूं शकतात, हें यापूर्वी वारंवार सिद्ध झालें आहे. ह्याच कारणास्तव आपल्या २१ डिसेंबरच्या पत्रांत आपली खात्री ज्या माहितीवर आधारलेली आहे तिच्या खरेपणाविषयीं माझी खात्री पटवून द्या, अशी मी आपल्याकडे याचना केली. ज्याप्रकारें मीं स्वतःचें मतप्रदर्शन करावयास हवें होतें अशी आपण अपेक्षा केली आहे त्यामध्यें माझी मूलभूत अडचण कोणती तें आतां कदाचित् आपणांस उमजेल.

तथापि अहिंसेवर पूर्वी कधींकाळीं माझी जितकी अढळ श्रद्धा होती तितकीच ती आजहि आहे, अशी उघड व उच्च घोषणा मी करूं शकतों. राष्ट्रसभेच्या कार्यकर्त्यांनीं यत्किंचित् हिंसा जरी केली तरी तिचा प्रकट व निःसंदिग्ध रीतीनें मी निषेध करीत आलों आहे, हें आपणांस विदित नसेल. किंबहुना अनेक वेळां मीं सर्व लोकांकरितां म्हणून देहदंडहि सोसलेला आहे. उदाहरणें देऊन मीं आपल्याला शिणविणें बरें नव्हे. मला जी गोष्ट प्रस्थापित करावयाची आहे ती हीच कीं, अशा प्रत्येक प्रसंगीं मी स्वतंत्र मनुष्य होतों.

मीं नम्रतापूर्वक म्हटल्याप्रमाणें, ह्या वेळेस मात्र माघार घेणें सरकाराकडे आहे. आपल्या मताविरुद्ध मत व्यक्त केल्या-बद्दल आपण मला क्षमा करावी. मीं आपली भेट घेणार असल्याचें ८ ऑगस्टच्या रात्रीं जें घोषित केलें होतें तद्‌-नुसार वाट पाहून आपण मला भेट घेऊं दिली असती, तर माझी खात्री आहे कीं, त्याचा परिणाम सर्वस्वीं हितकरच झाला असता. पण तें घडावयाचें नव्हतें.

येथें, हिंदुस्थान-सरकारानें ह्यापूर्वी आपल्या ज्या चुका कबूल केलेल्या आहेत त्यांचें स्मरण मी आपणांस करून देणें बरें : उदाहरणार्थ, पंजाबांत जनरल्‌ डायर यांस अपराधी ठरविलें; संयुक्त प्रांतांत कानपूरला एका मशिदीचा कोपरा पुनः बांधून दिला; आणि बंगालची फाळणी रद्द केली.

ह्या सर्व गोष्टी खवळलेल्या लोकसमुदायांकडून पूर्वी व मोठ्या प्रमाणावर अत्याचार झाल्यानंतरच करण्यांत आल्या होत्या.

सारांश:—

( १ ) मीं स्वतःपुरतेंच कांहीं करावें असें जर आपलें म्हणणें असेल, तर मी चुकलों आहें असें मला पटवून द्या. मी चांगली भरपाई करीन.

( २ ) राष्ट्रसभेच्या वतीनें मीं एखादी सूचना करावी असें जर आपलें म्हणणें असेल, तर राष्ट्रसभेच्या कार्यकारी समितीच्या सभासदांमध्यें मला आपण सोडावें. तेढ दूर

करण्याचा आपण मनाशीं निश्चय करावा, असें मी आपणांस आर्जवपूर्वक अवश्य म्हणतों.

जर माझा भावार्थ स्पष्ट झाला नसेल किंवा मीं आपल्या पत्राचें साग्र उत्तर दिलेलें नसेल, तर कोणत्या गोष्टी राहून गेल्या तें कृपा करून दाखवून द्या, म्हणजे मी आपलें समाधान करण्याचा प्रयत्न करीन. माझ्या मनांत कोणताहि आडपडदा नाहीं.

आपल्याला लिहिलेलीं माझीं पत्रें मुंबई-सरकाराच्या द्वारें आपणांकडे धाडलीं जातात असें दिसतें. ह्या रीतीनें कांहीं विलंब होणारच. प्रस्तुत प्रकरणीं प्रत्येक क्षणाला महत्त्व असल्यामुळें मीं आपल्याला लिहिलेलीं पत्रें ह्या छावणीच्या मुख्याधिकाऱ्याकडून सरळच धाडण्यांत यावीं अशी आपली आज्ञा होईल तर कदाचित् बरें.

आपला विश्वासू स्नेही
मो. क. गांधी

---

# म० गांधी यांस लॉर्ड लिन्‌लिथ्‌गो यांचें पत्र

(वैयक्तिक)

२५ जानेवारी, १९४३

प्रिय मि. गांधी,

आपलें ता. १९ जानेवारीचें वैयक्तिक पत्र मला नुकतेंच मिळालें असून मी त्याबद्दल फार आभारी आहें. मीं तें फार काळजीनें व लक्षपूर्वक वाचलें आहे, हें सांगणें नलगे. तरी पण मी अद्यापि कांहींसा अंधकारांतच आहे कीं काय नकळे. माझ्या गेल्या पत्रांत मीं आपणांस स्पष्ट करून सांगितलेंच आहे कीं, कितीहि अनिच्छेनें कां होईना परंतु, प्रकृत अनर्थपरंपरा व जें कांहीं घडत आहे त्याच्याशीं असलेला माझा परिचय यांवरून, राष्ट्रसभेची चळवळ आणि गेल्या ऑगस्टमधील निर्णयप्रसंगीं तिच्या वतीनें अधिकृत रीतीनें बोलण्याचा अधिकार प्राप्त झालेले 'कर्तुमकर्तुम्' समर्थ असे आपण यांना, गेल्या ऑगस्टपासून हिंदुस्थानाच्या लौकिकाची इतकी हानि व खराबी करण्यास कारणीभूत झालेल्या हिंसा, अत्याचार व क्रांतिकारक उद्योग यांच्या दुःखदायक मोहिमेबद्दल जबाबदार मानिल्याशिवाय मला गत्यंतरच उरलेलें नाहीं. आपण अहिंसेविषयीं जें म्हणतां तें मी लक्षांत घेत आहें. आपण हिंसेचा निःसंदिग्ध भाषेंत निषेध केलेला वाचून मला फार संतोष होतो, आणि आपण आपल्या तत्त्वप्रणालींत त्या गोष्टीस गतकाळीं जें महत्त्व दिलेलें आहे तें मला चांगलें

विदित आहे. परंतु गेल्या कित्येक महिन्यांतील घडामोडी, किंबहुना आजहि होत असलेल्या घडामोडी पाहतां असें दिसून येतें कीं, निदान आपल्या विशिष्ट अनुयायांकडून तरी त्या तत्त्वास पूर्ण पाठिंबा मिळालेला नाहीं; आणि आपण पुरस्कारिलेल्या ध्येयास ते अपुरे पडले असतील ही केवळ वस्तुस्थिति असली, तरी राष्ट्रसभा व तिचे अनुयायी यांच्या अत्याचारी चळवळीमुळें जे कोणी प्राणास मुकले त्यांच्या नातेवाइकांना आणि ज्यांनीं स्वतःची मालमत्ता गमावली अथवा भयंकर हानि सोसली त्यांना हें खचित उत्तर नव्हे. आणि मला वाटतें कीं, आपण स्वतः सर्व दोष हिंदुस्थान-सरकाराच्या पदरीं बांधिला आहे असें जें उत्तरीं सुचविलें आहे तें मी मान्य करूं शकत नाहीं. प्रस्तुत प्रकरणीं आपण वस्तुस्थितीचा विचार करीत असून तिला तोंड देणें प्राप्त आहे. आणि गेल्या पत्रीं स्पष्ट केल्याप्रमाणें, आपलें कांहीं म्हणणें असेल तें किंवा जी कांहीं विशिष्ट सूचना असेल ती स्वीकारण्यास जरी मी अतिशय उत्सुक आहें, तरी ह्या प्रकरणीं आत्मसमर्थन करण्याची जबाबदारी हिंदुस्थान-सरकारावर नसून राष्ट्रसभेवर व आपणां स्वतःवर आहे, हा सिद्धान्त अबाधितच होय.

२. म्हणून ९ ऑगस्टचा ठराव व त्या ठरावावरून व्यक्त होणारें धोरण आपण नाकारतों, किंवा त्याच्याशीं असलेला स्वतःचा संबंध तोडून टाकतों, असें मला कळविण्यास जर आपण उत्सुक असाल, आणि पुढील काळाविषयीं जर

योग्यसें अभिवचन देऊं शकाल, तर ह्या प्रकरणाचा विचार पुढें चालविण्यास मी सिद्ध आहें हें सांगणें नलगे. साहजिकच हा मुद्दा स्पष्टपणें उमजणें फार अवश्य आहे; आणि अत्यंत उघड शब्दांनीं मला तो स्पष्ट करावा लागत आहे म्हणून आपण गैरसमज करून घेणार नाहीं, हें मी जाणतों.

३. आपणांकडून होणारा कोणताहि पत्रव्यवहार स्वतःच्या द्वारें पाठविण्याची व्यवस्था करण्यास मी मुंबईच्या गव्हर्नरांस कळवीत आहें, आणि त्यामुळें तो धाडण्यांत होणारा विलंब कमी होईल असा मला भरंवसा वाटतो.

आपला विश्वासू
लिन्‌लिथ्‌गौ

---

# लॉर्ड लिन्‌लिथ्‌गौ यांस म० गांधींचें पत्र

२९ जानेवारी, १९४३

प्रिय लॉर्ड लिन्‌लिथ्‌गौ,

माझ्या १९ तारखेच्या पत्रास आपण स्गोलग उत्तर दिल्याबद्दल मला आपले मनःपूर्वक आभार मानिले पाहिजेत. आपलें पत्र स्पष्ट आहे असें आपल्याप्रमाणें मलाहि वाटतें तर बरें होतें. केवळ एखादें मत बळकट धरून बसणें म्हणजे स्पष्टता, असा अर्थ सूचित करण्याची आपलीहि इच्छा नसावी अशी मला खात्री वाटते. गेल्या ९ ऑगस्ट रोजीं व त्यानंतर लोकांकडून जे अत्याचार घडले ते राष्ट्रसभेच्या प्रमुख कार्यकर्त्यांची सरसकट धरपकड केल्यानंतर घडले असले तरीसुद्धां त्यांची जबाबदारी राष्ट्रसभेच्या ऑगस्टच्या ठरावावर आहे, ह्या आपल्या मताची यथार्थता मला पटवून देण्याचा निदान आपण प्रयत्न करावा, असें मीं आपणांस आर्जवून सांगितलें आहे, आणि कंठीं प्राण असेतोंपर्यंत आर्जवून सांगत राहीन. सरकाराचें कडक व असमर्थनीय वर्तन ह्या वृत्तपत्रांतून आलेल्या अत्याचारांबद्दल जबाबदार नव्हतें काय?

ऑगस्टच्या ठरावाचा कोणता भाग आपल्या मतें सदोष किंवा मर्यादाभंग करणारा आहे हेंसुद्धां आपण सांगितलेलें नाहीं. त्या ठरावान्वयें राष्ट्रसभेनें आपलें अहिंसेचें धोरण कोणत्याहि प्रकारें मागें घेतलेलें नाहीं. फासीवादाच्या (Fascism) प्रत्येक अंग-प्रत्यंगाला तिचा निश्चित विरोध आहे. केवळ ज्या परिस्थितींत सहकार्य परिणामकारक व राष्ट्रव्यापी होऊं

शकतें त्याच परिस्थितींत युद्धप्रयत्नामध्यें सहकार्य करण्याकडे त्याची प्रवृत्ति आहे, हें सर्व मत दोषार्हच आहे काय?

राष्ट्रसभेनें आपल्या ऑगस्टच्या ठरावान्वयें स्वतःकरितां कांहींच मागितलेलें नाहीं, ह्या अतिशय महत्त्वाच्या वस्तुस्थितीकडे सरकारानें उघड उघड दुर्लक्ष किंवा डोळेझांक केली आहे. तिच्या सर्व मागण्या संपूर्ण जनतेकरितां होत्या. आपणांस विदित असेलच कीं, म. अ. जिना यांस राष्ट्रीय सरकार बनविण्यास सरकारानें पाचारण करावें ह्या गोष्टीस राष्ट्रसभा अनुकूल व सिद्ध होती; युद्धकालपुरते अवश्य ते फेरफार उभय पक्षीं मान्य करून, अशा प्रकारचें सरकार रीतसर निवडून आलेल्या लोकसभेला (Assembly) जबाबदार राहावें इतकेंच काय तें. श्रीमती सरोजिनीदेवी यांच्याव्यतिरिक्त कार्यकारी समितीच्या इतर सभासदांपासून मला अलिप्त ठेविलें असल्यामुळें सांप्रत त्यांच्या मनांत काय आहे तें मला माहीत नाहीं. परंतु समितीनें आपलें मत बदललें असेल हें संभवनीय नाहीं. प्रस्तुत ठरावाच्या ज्या भागांत सविनय कायदेभंगाचा विचार केलेला होता त्यावर कदाचित् आक्षेप घेतां येईल. परंतु 'गांधी-अर्विन् करार' म्हणून जी गोष्ट प्रसिद्ध आहे तींत सविनय कायदेभंगाच्या तत्त्वाला गर्भित संमति दिलेली असल्यामुळें तोच तेवढा आक्षेपार्ह होऊं शकत नाहीं. त्या सविनय कायदेभंगालासुद्धां, आपल्या ज्या भेटीचा समय मीं ठरवावयाचा होता तिचा निर्णय कळण्यापूर्वी प्रारंभ करावयाचा नव्हता.

ह्यानंतर भारतमंत्र्यासारख्या जबाबदार मंत्र्याकडून राष्ट्रसभेवर व माझ्यावर जे असिद्ध, आणि माझ्या मतें, असिध्य आरोप झोंकून देण्यांत आले आहेत ते घ्या.

मला सुरक्षितपणें असें खचित म्हणतां येईल कीं, केवळ अधिकारबलावर (*ipse dixit*) केलेल्या विधानांनीं नव्हे, तर बळकट पुराव्यानिशीं सरकारानें आपल्या कृतीचें समर्थन करावें.

पण राष्ट्रसभानुयायी म्हणून प्रसिद्ध असलेल्या लोकांकडून खून झाले, ही गोष्ट आपण माझ्या तोंडावर फेकीत आहां. खून झाले, ही वस्तुस्थिति आपणांइतकीच मलाहि स्पष्ट दिसत आहे हें आपण मान्य कराल, अशी मला आशा आहे. माझें उत्तर असें कीं, लोक वेडावून जाण्यापर्यंत सरकारानें त्यांस प्रक्षुब्ध केलें. पूर्वोक्त धरपकडींच्या रूपानें त्यांनीं सिंहासारखी हिंसा आरंभिली. ती हिंसा 'एका दांताला एक दांत' हा जो मोझेसचा कायदा त्याच्याऐवजीं, एकाला दहा हजार ह्या प्रचंड प्रमाणावर संघटित झालेली आहे म्हणून कांहीं ती कमी नव्हे—मग मोझेसच्या कायद्याचा उपसिद्धान्त असा येशू ख्रिस्तप्रणीत जो 'अप्रतिकार' त्याविषयीं तर सांगावयालाच नको! सर्वसत्ताधीश हिंदुस्थान-सरकाराच्या दडपशाही उपायांचा अन्य कोणत्याहि रीतीनें मला अर्थ लावतां येत नाहीं.

ह्या करुण कहाणींत हिंदुस्थानभर पसरलेल्या महागाईमुळें लक्षावधि गोरगरिबांच्या हाल-अपेष्टांची भर पडलेली आहे. लोकनियुक्त कायदेमंडळाला जबाबदार असें खरेंखुरें राष्ट्रीय

सरकार असतें तर ह्या जरी सर्वस्वीं थांबवितां आल्या नसत्या तरी त्या बहुतांशीं कमी करतां आल्या असत्या, असें मला वाटल्याशिवाय राहत नाहीं.

मग जर माझ्या दुःखोपशमनाचें औषध मला लाभणार नसेल, तर सत्याग्रह्यांसाठीं विहित असलेल्या धर्माचा—शक्त्यनुसार उपोषणाचा-अवलंब करणें मला भाग आहे. ९ फेब्रुवारी रोजीं प्रातःकाळच्या उपाहारानंतर मला आपलें २१ दिवसांचें उपोषण आरंभणें प्राप्त असून २ मार्चला सकाळीं तें संपेल. उपोषणकालांत बहुतकरून मी क्षार टाकलेलें पाणी घेत असतों. पण आतांशा माझ्या प्रकृतीला पाणी नकोसें वाटतें. म्हणून ह्या खेपेस पाणी पितां येण्याकरितां त्यांत आम्ल फलांचे रस टाकण्याचें मी योजीत आहें; कारण, माझी इच्छा प्राणान्तिक उपोषण करण्याची नसून, ईश्वरी संकेत जर तसा असेल तर, ह्या दिव्यांतून जगून-वांचून राहण्याची आहे. सरकारानें अवश्य तो दुःखपरिहार केल्यास ह्याच्याहि पूर्वी हें उपोषण समाप्त करतां येईल.

मी ह्या पत्रावर 'वैयक्तिक' म्हणून पूर्वीच्या दोन पत्रांप्रमाणें खूण करीत नाहीं. तीं कोणत्याहि प्रकारें गुप्त नव्हतींच. तीं म्हणजे केवळ एक वैयक्तिक याचना होती.

आपला विश्वासू स्नेही
मो. क. गांधी

## म० गांधी यांस लॉर्ड लिन्‌लिथ्‌गौ यांचें पत्र

५ फेब्रुवारी, १९४३

प्रिय मि. गांधी,

आपलें २९ जानेवारीचें पत्र मला नुकतेंच मिळालें असून त्याबद्दल मी फार आभारी आहें. नेहमीप्रमाणेंच मीं तें मोठ्या काळजीनें आणि आपला मनोदय समजून घेऊन मुद्दा पूर्णपणें लक्षांत घेण्याच्या उत्कंठेनें वाचलें आहे. परंतु मला असें म्हणावेंसें वाटतें कीं, गेल्या पावसाळ्यांत जे शोचनीय अत्याचार घडले त्यांविषयीं राष्ट्रसभा व व्यक्तिशः आपण स्वतः यांच्यावरील जबाबदारीसंबंधींची माझी दृष्टि बदललेली नाहीं.

२. माझ्या गेल्या पत्रांत मीं असें सांगितलें कीं, वस्तुस्थितीसंबंधींच्या माझ्या माहितीप्रमाणें, राष्ट्रसभेची चळवळ आणि गेल्या ऑगस्टमधील निर्णयप्रसंगीं अधिकृत व 'कर्तुम-कर्तुम्' सत्ता प्राप्त झालेले पुढारी ह्या नात्यानें आपण स्वतः यांना, त्यानंतर भडकलेल्या हिंसा व अत्याचार ह्यांच्या मोहिमेस जबाबदार मानण्याशिवाय मला गत्यंतर उरलेलें नाहीं. ह्याला उत्तर म्हणून आपण पुनः मला अशी विनंती केली आहे कीं, माझें मत यथार्थ आहे हें आपणांस पटवून देण्याचा मीं प्रयत्न करावा. आपण मनांत कांहींएक किंतु न बाळगतां ही माहिती मागत आहां असें जर आपल्या पत्रांवरून दिसून आलें असतें—आणि तें दिसून यावें अशी अपेक्षा मला न्यायतः करतां यावयास हवी होती—तर ती

विनंती यापेक्षांसुद्धां लवकर मीं मान्य केली असती. परंतु त्यांपैकीं प्रत्येकांत आपण अलीकडील घडामोडीं-संबंधीं प्रसिद्ध झालेल्या वृत्तान्तांविषयीं गाढ अविश्वास व्यक्त केलेला आहे; आणि तरीसुद्धां त्याच माहितीच्या आधारें आपण आपल्या गेल्या पत्रीं त्यांचा सर्व दोष हिंदुस्थान-सरकारावर टाकण्यास मागेंपुढें पाहिलेलें नाहीं. त्याच पत्रीं आपण असें म्हटलें आहे कीं, मी ज्या सरकारी वृत्तान्तांवर अवलंबून आहें त्यांचा बिनचूकपणा आपण मान्य करावा अशी अपेक्षा मीं आपणांकडून करूं नये. म्हणून, मला हें स्पष्ट कळत नाहीं कीं, कोणत्याहि गोष्टीची खातरजमा मीं आपल्याला करून द्यावी अशी अपेक्षा किंवा इच्छा तरी आपण कशी करूं शकतां? परंतु वस्तुतः पाहतां, राष्ट्रसभेनें ८ ऑगस्टच्या ठरावानें आपल्या मागण्यांच्या समर्थनार्थ 'सामुदायिक लढा' घोषित केला, आपल्याला त्याचे पुढारी नेमिलें, आणि चळवळीच्या नेतृत्वांत व्यत्यय आल्यास सर्व राष्ट्रसभानुयायांना स्वतःच्या जबाबदारीवर वागण्याचा अधिकार दिला, तेव्हांपासून जे जे शोचनीय अत्याचार आणि विध्वंसनाचे व दहशतीचे प्रकार घडून आले त्यांबद्दल राष्ट्रसभा व तिचे पुढारी यांस जबाबदार धरण्यास जीं कारणें आहेत तीं हिंदुस्थान-सरकारानें कधींच गुप्त ठेविलेलीं नाहींत. अशा शब्दांत ठराव करणाऱ्या संघटनेला तदनंतर घडून आलेल्या कोणत्याहि गोष्टींची जबाबदारी न्यायतः क्वचितच टाळतां येईल.

ह्या धोरणापासून अत्याचार घडतील अशी आपली व आपल्या सोबत्यांची अपेक्षा होती, त्यांजकडे दुर्लक्ष करण्यास आपण तयार होतां, आणि पुढें जे अत्याचार झाले ते राष्ट्रसभेच्या पुढाऱ्यांना पकडण्याच्याहि पुष्कळ पूर्वी संकल्पिलेल्या एका योजनेस अंगभूत म्हणून झाले याविषयीं पुरावा आहे. राष्ट्रसभेविरुद्ध असलेल्या कैफियतीचें सर्वसाधारण स्वरूप होम मेंबर यांनीं गेल्या सेप्टेंबरच्या १५ तारखेस मध्यवर्ती लोकसभेंत केलेल्या आपल्या भाषणांत प्रकटपणें मांडिलें आहे, आणि आपल्याला अधिक माहिती हवी असेल तर त्याकडे मी आपलें लक्ष वेधतों. आपण पाहिलेले वृत्तपत्रीय वृत्तान्त कदाचित् अपुरे असतील म्हणून त्याची एक समग्र प्रत सोबत धाडीत आहे. मला अधिक सांगावयाचें तें इतकेंच कीं, त्यानंतर उघडकीस आलेल्या एकंदर पुराव्यावरून तेव्हां काढलेल्या सिद्धान्तांस बळकटीच आलेली आहे. अखिल-भारतीय राष्ट्रसभा-समितीच्या नांवानें गुप्त सूचना प्रसृत करून विध्वंसनाची (sabotage) मोहीम चालविली जाते ह्याविषयीं माझ्यापाशीं भरपूर माहिती आहे. राष्ट्रसभेच्या सुप्रसिद्ध अनुयायांनीं अत्याचार व खून करण्याकरितां संघटना निर्माण करून त्यांस सढळपणानें हातभार लाविलेला आहे: सध्यांहि राष्ट्रसभेची एक गुप्त संघटना अस्तित्वांत असून तिजमध्यें इतरांबरोबर राष्ट्रसभेच्या कार्यकारी समितीच्या एका सदस्याच्या पत्नीचें प्रामुख्यानें अंग आहे; आणि ज्या बॉबच्या अत्या-

चारांनीं व इतर दहशतीच्या कृत्यांनीं सर्व देश विटून गेला आहे ते प्रकार संघटित करण्यांत हीच संघटना प्रत्यक्षपणें गुंतलेली आहे. ह्या सर्व माहितीच्या बळावर आम्ही कांहीं करीत नसलों आणि ती जगजाहीर करीत नसलों तर त्याचें कारण इतकेंच कीं, ती वेळ अद्यापि आलेली नाहीं. परंतु राष्ट्रसभेवरील आरोपांना आज ना उद्यां जाब द्यावा लागेल, आणि तेव्हां आपल्याला व आपल्या सहकाऱ्यांना शक्य असल्यास जगापुढें त्यांतून सुटून जावें लागेल ह्याविषयीं आपण खात्री बाळगावी. आणि जर का दरम्यानच्या काळांत आपण स्वतः सध्यां ज्या कोणत्यातरी योजनेंत असल्याचें दिसतें तदनुसार सहजासहजीं सुटून जाण्याचा प्रयत्न कराल, तर आपल्या पश्चात् निर्णय आपल्याविरुद्ध जाईल.

३. 'गांधी-अर्विन् करार' म्हणून आपण जिचा उल्लेख केला आहे त्या ५ मार्च १९३१ रोजीं झालेल्या तडजोडींत सविनय कायदेभंगाच्या तत्त्वास गर्भितपणें संमति दिलेली आहे, हें आपलें विधान वाचून मला कांहींसें आश्चर्य वाटलें. तो लेख मीं पुनः पाहिला आहे. सविनय कायदेभंग "व्यावहारिकरीत्या बंद करण्यांत येईल", आणि सरकाराकडून कांहीं "अन्योन्य व्यवहार" घडेल, अशा पायावर ती तडजोड उभारलेली होती. अशा लेखांत सविनय कायदेभंगाचें अस्तित्व लक्षांत घेतलें जाणें स्वाभाविक होतें. परंतु सविनय कायदेभंग कोणत्याहि परिस्थितींत कायदेशीर मानिला गेला होता असें

सूचित करणारें मला त्यांत कांहींएक आढळत नाहीं. आणि आमच्या सरकारानें तें असें कधींहि मानिलेलें नाहीं, हें मीं जितकें स्पष्ट करावें तितकें थोडेंच होणार आहे.

४. आपण पुढें मांडलेली विचारसरणि स्वीकारावयाची म्हणजे, शांतता व सुव्यवस्था राखण्याची ज्यांच्यावर जबाबदारी आहे अशा अधिकृत सरकारानें, आपण स्वतःच उघड बंड असें ज्याचें वर्णन केलें आहे त्या राज्यव्यवस्था उलथून पाडणाऱ्या व क्रांतिकारक चळवळी विनविरोध चालूं देऊन, दळणवळणाच्या साधनांत व्यत्यय, निरपराध लोकांवर हल्ले, पोलिस अधिकाऱ्यांचे व इतरांचे खून इत्यादि गोष्टींची तयारी अप्रतिहत करूं द्यावी, ह्यास मान्यता दिल्या-सारखें होणार आहे. किंबहुना मी व आमचें सरकार, आपल्याविरुद्ध व राष्ट्रसभेच्या पुढाऱ्यांविरुद्ध यापेक्षांहि पूर्वीच कडक उपाय योजावयास हवे होते ह्या आरोपास पात्र आहों. परंतु आपण जी प्रतिज्ञा केलेली आहे तिजपासून निवृत्त होण्याची शक्य ती प्रत्येक संधि आपल्याला व राष्ट्र-सभेच्या संघटनेला द्यावी म्हणून मी व आमचें सरकार सदैव अत्यंत आतुर राहिलेलों आहों. गेल्या जून व जुलै महिन्यांतील आपलीं पत्रकें, कार्यकारी समितीचा १४ जुलैचा मूळ ठराव, आणि आतां तडजोडीला अवकाश उरलेला नसून सरतेशेवटीं तें एक उघड बंडच होय अशी आपण त्याच दिवशीं केलेली घोषणा, ह्या सर्व गोष्टी "करा किंवा मरा" ह्या आपल्या निर्वाणीच्या उपदेशाव्यतिरिक्तहि भयंकर व साभिप्राय आहेत. परंतु कदाचित् अस्थानीं सोशिकपणामुळेंच कां म्हणाना, हिंदुस्थानाच्या

लोकांसंबंधींची आपल्यावरील जबाबदारी सरकाराला पार पाडावयाची असेल तर, अखिल-भारतीय राष्ट्रसभा-समितीच्या ठरावानें राष्ट्रसभेच्या वृत्तीसंबंधीं क्षमाशीलता बाळगणें शक्य नाहीं असें स्पष्ट होईपर्यंत वाट पाहावी, असें ठरविण्यांत आलें.

५. सरतेशेवटीं, आपली प्रकृति व आपलें वयोमान लक्षांत घेतां, आतां जो निर्धार करण्याचें आपल्या मनांत आहे असें आपण मला सांगत आहां त्याविषयीं मला किती खेद होत आहे म्हणून सांगूं! अद्यापि आपल्याला अधिक शाहाणपणाचा मार्ग सुचो, अशी मी अपेक्षा व प्रार्थना करितों. परंतु तदनुषंगिक धोका पतकरून उपोषण करावें कीं न करावें ह्याविषयींचा निर्णय हा आपणच केला पाहिजे हें उघड असून, त्याची व त्याच्या परिणामाची जबाबदारीहि आपल्या एकट्यावरच पडणार आहे. मी असा मनःपूर्वक भरंवसा बाळगतों कीं, मीं जें कांहीं म्हटलें आहे तें लक्षांत घेऊन आपण आपल्या कृतसंकल्पाचा अधिक चांगला विचार कराल, आणि आपण अधिक चांगला विचार करण्याचें ठरविल्यास मी त्या गोष्टीचें स्वागत करीन. कारण कीं, आपण आपलें जीवित बुध्द्या धोक्यांत घातलेलें पाहण्यास माझें मन स्वभावतःच कचरतें म्हणूनच केवळ नव्हे, तर राजकीय हेतु-सिध्यर्थ उपोषणाचा उपयोग करणें म्हणजे ती एकप्रकारची राजकारणी धमकी ( हिंसा ) असून नैतिकदृष्ट्या असमर्थनीय होय असें मी मानतों, आणि आपल्या पूर्वीच्या लेखांवरून पाहतां आपलेंहि मत तसेंच आहे अशी माझी समजूत आहे.

आपला विश्वासू
लिन्‌लिथ्‌गौ

# लॉर्ड लिन्लिथ्गो यांस म० गांधींचें पत्र

७ फेब्रुवारी, १९४३

प्रिय लॉर्ड लिन्लिथ्गो,

गेल्या ५ फेब्रुवारीच्या आपल्या दीर्घ उत्तराबद्दल मला आपले आभार मानिले पाहिजेत. आपला शेवटचा मुद्दा—९ तारखेस चालूं होणारें संकल्पित उपोषण—मी प्रथम घेईन म्हणतों. सत्याग्रहाच्या दृष्टीनें, आपलें पत्र म्हणजे उपोषणार्थ निमंत्रणच होय. हें पाऊल टाकण्याची व त्याच्या परिणामांची जबाबदारी सर्वस्वीं माझ्यावर राहील यांत शंका नाहीं. आपण आपल्या लेखणींतून जो एक उद्गार सटकन् येऊं दिला आहे त्याची अपेक्षा मात्र मीं केली नव्हती. दुसऱ्या परिच्छेदाच्या शेवटच्या वाक्यांत ह्या पावलाचें वर्णन "सहजा-सहजीं सुटून जाण्याचा प्रयत्न", असें आपण केलें आहे. आपण स्नेही ह्या नात्यानें अशा प्रकारचा निंद्य व भ्याडपणाचा आरोप मजवर करूं शकतां याची मला कल्पनाच करवत नाहीं. "एकप्रकारची राजकारणी धमकी" असेंहि ह्याचें वर्णन आपण केलें आहे; आणि ह्याविषयीं माझ्याच लेखांचा माझ्या-विरुद्ध आधार आपण दिला आहे. मी आपल्या लेखांना धरून आहें. त्यांत संकल्पित पावलाशीं विसंगत असें कांहींएक नाहीं असें माझें मत आहे. आपण स्वतः ते लेख वाचले आहेत कीं नाहीं याचाहि मला वानवाच दिसतो.

माझी चूक पटवून देण्यास मीं जेव्हां आपल्याला सांगितलें तेव्हां आपल्यापाशीं मीं मनमोकळेपणानें याचना केली होती,

असें मी अवश्य म्हणतों. प्रसिद्ध झालेल्या वृत्तान्तांविषयीं "गाढ अविश्वास" हा माझ्या मनमोकळेपणाशीं कोणत्याहि प्रकारें विसंगत नाहीं.

मीं–माझ्या सोबत्यांना क्षणभर बाजूस ठेवा—"ह्या धोरणापासून अत्याचार घडतील अशी अपेक्षा केली होती" मी "त्यांजकडे डोळेझांक करण्यास तयार होतों", आणि "जे अत्याचार घडले ते राष्ट्रसभेचे पुढारी पकडले जाण्याच्या फार पूर्वी संकल्पिलेल्या संघटित योजनेस अंगभूत होते," ह्याविषयीं पुरावा आहे, असें आपण म्हणतां. मीं तरी अशा भयंकर आरोपास पोषक असा पुरावा पाहिलेला नाहीं. पुराव्याचा कांहीं भाग अद्यापि प्रसिद्ध व्हावयाचा आहे, हें आपणांसहि मान्य आहे. होम मेंबर यांचें भाषण–ह्याची एक प्रत आपल्या कृपेनें मला मिळाली आहे–म्हणजे, सरकारपक्षीय वकिलाचें उपक्रमाचें भाषण यापेक्षां त्यास महत्त्व नाहीं, असें म्हणतां येईल. त्यामध्यें राष्ट्रसभेच्या लोकांविरुद्ध निराधार आरोप आहेत. अर्थात् अत्याचारांचा जो भडका उडाला त्याचें त्यांनीं रसभरित वर्णन केलें आहे. पण तो तेव्हांच कां उडाला, हें त्यांनीं सांगितलेलें नाहीं. अनेक स्त्री-पुरुषांना त्यांची रीतसर चौकशी न करतां आणि त्यांचें स्वसमर्थनार्थ म्हणणें ऐकून न घेतां आपण शिक्षा सांगितली आहे. ज्या पुराव्याच्या बळावर आपण त्यांना अपराधी गणिलें आहे तो मला दाखवा, असें आपल्याला सांगण्यांत मी खचित

कांहींएक चुकलों नाहीं. आपण आपल्या पत्रीं जें लिहितां त्यावरून खात्री पटत नाहीं. पुरावा इंग्रजी कायदेशास्त्राच्या नियमांस अनुसरून असला पाहिजे.

जर कार्यकारी समितीच्या एका सदस्याची बायको "बॉंबचे अत्याचार व इतर दहशतीचीं कृत्यें संघटित" करण्यांत प्रत्यक्ष गुंतली असेल, तर न्यायासनापुढें तिची चौकशी करून ती अपराधी ठरल्यास तिला शासन करावें. आपण उल्लेखिलेल्या स्त्रीनें तिजवरील आरोपित गोष्टी ९ ऑगस्टला घडलेल्या सरसकट धरपकडीनंतरच करणें शक्य असून ह्या प्रकारांना "सिंहासारखी हिंसा" असें संबोधण्याचें मीं धाष्टर्य केलें आहे.

राष्ट्रसभेवर केलेले आरोप प्रसिद्ध करण्याची वेळ अद्यापि आलेली नाहीं, असें आपण म्हणतां. पण एखाद्या निःपक्ष-पाती न्यायासनापुढें मांडले गेले असतां ते निराधार ठरण्याचा संभव आहे ह्याचा आपण कधींतरी विचार केला आहे काय ? अथवा अपराधी ठरलेल्या लोकांपैकीं कांहींजण मध्यंतरीं मरून गेलेले असले, किंवा जगूनवांचून राहिलेल्या लोकांना जो पुरावा देणें शक्य आहे त्यांतून कांहीं मिळेनासा झाला, तर त्याची वाट काय ?

हिंदुस्थान-सरकारच्या वतीनें तेव्हांचे व्हाइसरॉय व राष्ट्र-सभेच्या वतीनें मी स्वतः यांच्यामध्यें ५ मार्च १९३१ रोजीं जी तडजोड झाली तींत सविनय कायदेभंगाच्या तत्त्वाला गर्भित संमति दिलेली होती, ह्या माझ्या विधानाचा मी

पुनरुच्चार करितों. ती तडजोड विचारांतहि घेण्यापूर्वी राष्ट्र-सभेच्या प्रमुख अनुयायांना बंधमुक्त केलें होतें, ही गोष्ट आपणांस विदित असावी असें मला वाटतें. त्या तडजोडीस अनुसरून राष्ट्रसभेच्या अनुयायांना कांहीं भरपाई करून दिली होती. सरकाराकडून अटी पूर्ण झाल्यावरच सविनय कायदेभंग थांबविण्यांत आला ही एकच गोष्ट घेतली तरीसुद्धां, माझ्या मतें, त्याच्या कायदेशीरपणास—अर्थात् त्या विशिष्ट परिस्थितींत, मान्यता मिळालेली होती. ह्यास्तव आपल्या सरकाराला सविनय कायदेभंग " कोणत्याहि परिस्थितींत कायदेशीर मानतां येत नाहीं," असें आपणांस प्रतिपादतांना पाहून कांहींसा विस्मय वाटतो. ह्या कायदेशीरपणाला " अप्रत्यक्ष प्रतिकार " ह्या नांवानें मान्यता देण्याची ब्रिटिश सरकाराची वहिवाट असून तिजकडे आपण दुर्लक्ष करीत आहां.

शेवटीं सांगावयाचें म्हणजे, आपण माझ्या पत्रांमधून, त्यांपैकींच एकांत मीं शुद्ध अहिंसेस चिकटून राहण्याची घोषणा केलेली असतां, तिच्याशीं सर्वस्वीं विसंगत असा अर्थ काढीत आहां; कारण, आपल्या ज्या पत्राचें उत्तर मी देत आहें त्यांत आपण असें म्हणत आहां कीं, मीं मांडलेली विचारसरणि स्वीकारावयाची म्हणजे, शांतता व सुव्यवस्था राखण्याची ज्यांच्यावर जबाबदारी आहे अशा अधिकृत सरकारानेंअत्याचार, दळणवळणाच्या साधनांत व्यत्यय, निरपराध लोकांवर हल्ले, पोलिस अधिकाऱ्यांचे व इतरांचे खून इत्यादिविषयक तयारी

अप्रतिबद्ध रीतीनें करूं पाहणाऱ्या चळवळी चालूं द्याव्या, ह्या गोष्टीस मान्यता देण्यासारखें होणार आहे. अशा गोष्टी कायदेशीर मानण्यास जो सांगूं शकतो असें आपणांस वाटतें, तो मी आपला एक विलक्षणच स्नेही असलों पाहिजे खास!

ज्या मतांचा व विधानांचा आरोप मजवर केला आहे त्यांना सांगोपांग उत्तर देण्याचा प्रयत्न मीं केलेला नाहीं. असें उत्तर देण्याचें हें स्थळ नव्हे किंवा समयहि नव्हे. माझ्या मतें ज्या गोष्टींना तावडतोब उत्तर देणें अवश्य होतें तेवढ्याच मीं निवडल्या आहेत. मीं स्वतः जें दिव्य करण्याचें योजिलें आहे त्यांतून सुटून जाण्यास आपण मला अवकाशच ठेविलेला नाहीं. ९ तारखेस अत्यंत विशुद्ध अन्तःकरणानें मी त्यास आरंभ करितों. "राजकारणी धमकीचा एक प्रकार" असें आपण त्याचें वर्णन केलेलें असलें तरी, माझ्या दृष्टीनें, मी आपणांकडून जो न्याय मिळवूं शकलों नाहीं तो मिळविण्यासाठीं अत्युच्च न्यायमंदिराकडे केलेली याचना, अशा अर्थी मीं तें योजिलें आहे. ह्या दिव्यांतून मी जर पार न पडलों तर आपल्या निरपराधित्वाविषयीं बालंबाल श्रद्धा बाळगून मी न्यायासनापुढें जाईन. 'कर्तुमकर्तुम्' समर्थ अशा सरकाराचे प्रतिनिधि ह्या नात्यानें आपण, आणि स्वदेशाची व तद्द्वारा मानवजातीची सेवा करण्याचा प्रयत्न ज्यानें केला आहे असा मी एक पामर, ह्या उभयतांमध्यें पुढील पिढ्या काय तो निर्णय देतील.

आपला विश्वासू स्नेही

मो. क. गांधी

---

# हिंदुस्थान-सरकाराच्या होम डिपार्टमेंटचे जादा चिटणीस व म० गांधी यांच्यामधील पत्रें

७ फेब्रुवारी, १९४३

प्रिय मि. गांधी,

नामदार व्हाइसरॉय यांजकडून—आपण त्यांना लिहिल्या-प्रमाणें—विशिष्ट परिस्थितींत २१ दिवसांचें उपोषण करण्याचा आपला संकल्प हिंदुस्थान-सरकारास कळविण्यांत आला आहे. ह्या गोष्टीचा त्यांनीं काळजीपूर्वक विचार केला आहे, आणि त्या दृष्टीनें त्यांनीं जे निर्णय केले आहेत ते एका पत्रकांत मांडलेले असून त्याची एक प्रत सोबत धाडली आहे. आपण आपला प्रस्तुत संकल्प अढळ ठेविल्यास हें पत्रक योग्य समयीं वृत्तपत्रांकडे प्रसिद्धीसाठीं देण्याचा ते विचार करतील.

हिंदुस्थान-सरकाराच्या पत्रकावरून आपल्याला आढळून येईल कीं, आपण उपोषण केल्याचें दिसून आल्यास त्यांस अतिशय असमाधान होईल; आणि या पत्रकांत स्पष्ट केल्या-प्रमाणें मला आपणांस असें कळविण्याची आज्ञा झाली आहे कीं, स्वकीय संकल्प तडीस नेण्याचा आपण आग्रह धरल्यास तत्प्रीत्यर्थ, आणि उपोषणास आरंभ होऊन तें समाप्त होईतोंपर्यंत, आपली मुक्तता करण्याचें ते योजतील. उपोषणकालांत आपल्या इच्छेस येईल तेथें आपल्याला जाण्यास प्रत्यवाय राहणार नाहीं. मात्र हिंदुस्थान-सरकाराला

असा भरंवसा वाटतो कीं, आपली आगाखानांच्या वाड्या-बाहेरील राहण्याची व्यवस्था आपणांस करणें शक्य होईल.

जर कांहीं कारणास्तव ह्या व्यवस्थेचा आपणांस उपयोग करून घेणें शक्य होणार नसेल–अशा निर्णयानें हिंदुस्थान-सरकारास अतिशय खेद होईल–तर ते अर्थात् आतां सोबत पाठविलेल्या पत्रकाच्या प्रतींत, तें बाहेर पडण्यापूर्वी योग्य ते फेरफार करतील. तथापि ज्या सारासारविचारांना त्यांनीं महत्त्व दिलें आहे त्यांस आपणहि तितकेंच महत्त्व देऊन आपण आपली सध्यांची तात्पुरती योजना पुढें नेऊं नये ह्याविषयींची त्यांची तीव्र मनीषा व आशा मी अत्यंत उत्कटतेनें पुनः व्यक्त करावी, अशी त्यांची इच्छा आहे. त्या पक्षीं, कोणत्याच प्रकारचें पत्रक काढण्याचा अर्थात् प्रसंग येणार नाहीं.

आपला विश्वासू
आर्. टॉट्टेन्हॅम्

## सर आर्. टॉट्टेन्हॅम् यांस म० गांधींचें पत्र

८ फेब्रुवारी, १९४३

प्रिय सर रिचर्ड,

मीं अतिशय काळजीनें आपल्या पत्राचें पठन केलें आहे. मी व नामदार व्हाइसरॉय यांच्यामध्यें झालेल्या पत्रव्यवहारांत किंवा आपल्या पत्रांत मीं आपला उपोषणाचा संकल्प मागें घ्यावा असें कांहींच नाहीं, हें लिहिण्यास मला खेद होतो. ह्या उपक्रमाचें ज्या अटींवर निवारण होऊं शकेल किंवा त्याची तहकुबी मिळवितां येईल त्या, मीं नामदारसाहेबांना लिहिलेल्या पत्रांत सांगितल्याच आहेत.

जर तात्पुरती मुक्तता ही माझ्या सोईसाठीं करावयाची असेल तर तिची मला आवश्यकता नाहीं. राजबंदी किंवा कैदी ह्या नात्यानें उपोषण करूनहि मला अगदीं समाधान होईल. जर ती सरकाराच्या सोयीसाठीं असेल तर, माझी तशी पुष्कळशी इच्छा असूनहि, त्यांना मला सोइस्कर होणें शक्य नाहीं याचें मला वाईट वाटतें. मी एवढेंच सांगूं शकतों कीं, कैदी ह्या नात्यानें उपोषणाला जात्याच अंगभूत असणाऱ्या गैरसोयीव्यतिरिक्त मनुष्यधर्माला शक्य होईल तितकी गैर-सोय मी टाळीन. आगामी उपोषणाची कल्पना, स्वतंत्र व्यक्ति म्हणून तें करावयाचें आहे, अशा दृष्टीनें केलेली नाहीं. पूर्वीं झाली त्याप्रमाणें अशीहि परिस्थिति निर्माण होऊं शकेल कीं, जेव्हां स्वतंत्र व्यक्ति म्हणून मला तें करावें लागेल. ह्यास्तव जर माझी मुक्तता करण्यांत आली तर माझ्या पत्रव्यवहारांतील

पूर्वोक्त अटींस अनुसरून उपोषण घडणार नाहीं. मला एकंदर स्थितीची अथपासून नव्यानें पाहणी करून काय करावयाचें तें ठरवावें लागेल. उगाच कांहीं तरी बतावणी करून सुटका करून घेण्याची माझी इच्छा नाहीं. माझ्याविरुद्ध जें कांहीं सर्व म्हटलें गेलें आहे त्याची क्षिति न बाळगतां, सत्य व अहिंसा यांचें मीं जें व्रत स्वीकारिलें आहे त्याची प्रतारणा मजकडून घडणार नाहीं, अशी मी आशा बाळगतों; कारण, केवळ ह्यामुळेंच मला आपलें जीवित जीवनार्ह वाटतें. केवळ माझ्या स्वतःच्या समाधानार्थ सुद्धां मी असें म्हणतों. माझ्यासभोंवतीं आतांच्या घटकेसारखा बाह्य अंधकार जेव्हां पसरतो, तेव्हां आपल्या श्रद्धेचा उघडपणें पुनरुच्चार करणें मला हितावह होतें.

ह्या पत्रानें खळबळ उत्पन्न करून सरकाराला आपला निर्णय तडकाफडकीं देण्यास मीं भाग पाडतां कामा नये. आपलें पत्र टेलिफोनवरून उतरून घेण्यांत आलें असें समजतें. सरकारास पुरेसा वेळ देण्याकरितां म्हणून अवश्य तर येत्या बुधवारच्या १० तारखेपर्यंत मी आपलें उपोषण तहकूब करीन.

सरकारानें जें पत्रक काढण्याचें योजिलें आहे आणि ज्याची एक प्रत आपण मजकडे धाडण्याची कृपा केली आहे, त्या संबंधांत मला मतच असूं शकत नाहीं. तथापि तें जर असूं शकेल तर मला असें सांगणें प्राप्त आहे कीं, त्यामुळें मला अन्याय होत आहे. योग्य मार्ग म्हटला म्हणजे, समग्र पत्रव्यवहार प्रसिद्ध करून लोकांना आपलें स्वतःचें मत बनवूं देणें हाच होय.

आपला विश्वासू
मो. क. गांधी

# म० गांधी यांस सर आर्. टॉट्टेन्हॅम् यांचें पत्र

९ फेब्रुवारी, १९४३

प्रिय मि. गांधी,

आपलें ८ फेब्रुवारी १९४३ चें पत्र गव्हर्नर-जनरल-इन्-काउन्सिल यांच्यापुढें ठेवण्यांत आलें असून त्याची पोंच देण्यास मला आज्ञा झाली आहे. हिंदुस्थान-सरकारानें आपला निर्णय मोठ्या खेदानें नमूद केला. पूर्वस्थिति अबाधित आहे—म्हणजे, आपल्या उपोषणार्थ व तें चालूं असेतोंपर्यंत, आपणांस मुक्त करण्यास सरकार सिद्ध आहे. परंतु त्या गोष्टीचा उपयोग करून घेण्याची आपली तयारी नसेल, आणि बंदिवासांतच आपण जर उपोषण करीत असाल, तर सर्वस्वीं स्वतःच्या जबाबदारीवर व स्वतः धोका पतकरून तसें आपण करणार आहां. त्या पक्षीं, आपले स्वतःचे वैद्यकीय परिचारक ठेवण्यास आणि त्या कालांत सरकाराच्या परवानगीनें स्नेह्यांसोबत्यांना भेटण्यास आपल्याला मोकळीक राहील. त्या पक्षीं, हिंदुस्थान-सरकाराकडून वर्तमानपत्रांकडे पत्रक धाडतांना मसुद्यांत योग्य ते फेरफार करण्यांत येतील.

आपला विश्वासू
आर्. टॉट्टेन्हॅम्

---

# म० गांधींचीं पांच महनीय उपोषणें

उपोषण पहिलें (१९२४): दिल्ली येथें मौ. महमद अलि यांच्या घरीं, हिंदु-मुसलमानांच्या एकीप्रीत्यर्थ. २१ दिवस.

,, दुसरें (१९३२): येरवड्याच्या तुरुंगांत, मॅक्डोनल्ड-जातीय-निर्णयाच्या निषेधार्थ. २१ दिवस.

,, तिसरें (१९३३): येरवड्याच्या तुरुंगांत, 'हरिजन'-द्वारा अस्पृश्यता-निवारणाचें कार्य पूर्ववत् चालू ठेवण्यास सरकारानें बंदी केल्यामुळें आरंभिलें; परंतु त्यानंतर लागलीच मुक्तता करण्यांत आली.

,, चौथें (१९३९): राजकोट येथें, तेथील दरबारा-विरुद्ध संस्थानी प्रजेच्या कैवारार्थ.

,, पांचवें (१९४३): आगाखान पॅलेसमधील बंदिवासांत, चालू सरकारी धोरणाच्या निषेधार्थ. २१ दिवस (ता. १०-२-४३ ते ३-३-४३).

---

सत्याग्रह-तत्त्वज्ञानाच्या अभ्यासकांसाठीं

## आमचीं प्रकाशनें

| | रु.आ. |
|---|---|
| सत्याचे प्रयोग—म. गांधी | २—८ |
| गांधीजींचीं पत्रें—म. गांधी | ०—६ |
| प्रसाददीक्षा—म. गांधी | १—० |
| गांधीजींचें विविध दर्शन—डॉ. राधाकृष्णन् | २—८ |
| गांधीविचारदोहन—श्री. मश्रूवाला | १—४ |
| आधुनिक भारत—आचार्य जावडेकर | ५—० |
| सत्याग्रही महाराष्ट्र—प्रेमा कंटक | ३—० |
| अर्थशास्त्र कीं अनर्थशास्त्र?—रस्किन् | १—४ |
| ग्रामोद्योगाचें अर्थशास्त्र—प्रो. कुमारप्पा | १—४ |

सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला

टिळक रस्ता, पुणें २

## 'लोकशिक्षण-लघुग्रंथमाला'

संपादक : गणेश गंगाधर जांभेकर

समाजनियंत्रण
श्री. ना. गो. चापेकर, बी.ए.,एल्एल्.बी. रु. १

हिंदुस्थानाचा आर्थिक इतिहास
प्रो. ध. रा. गाडगीळ, एम्.लिट्. (केंब्रिज) रु. २

श्रीज्ञानदेव ( चरित्र व तत्त्वज्ञान )
प्रो. शं. वा. दांडेकर, एम्.ए. रु. १

कविकुलगुरु कालिदास
श्री. के. ल. ओगले, बी ए. रु. १।

आधुनिक राज्यमीमांसा (भाग १ व २)
प्रो. शं. द. जावडेकर, बी.ए. प्रत्येकीं रु. १।

लोकमाता-आचार्य काका कालेलकर ०।१०

बडी दिदी-श्री. श्री. रा. मराठे, बी.ए. ०।८

विजिगीषु हिट्लर-श्री. ग. गं. जांभेकर ०।८

'लोकशिक्षण'-वर्षसंग्रह
(वर्ष १ ते ११) प्रत्येकीं रु. ५

पत्ता : व्यवस्थापक, 'लोकशिक्षण-कार्यालय'
१९९।५ सदाशिव पेठ, पुणें २